राष्ट्र हित!　　उद्योग हित!!　　श्रमिक हित!!!

# भारतीय मजदूर संघ

## सोळावे त्रैवार्षिक अखिल भारतीय अधिवेशन

दि. १९, २० व २१ फेब्रुवारी २०११, ठिकाण : जळगांव

चलो जलाए दीप वहाँ
जहाँ अभी भी अंधेरा है।

असंघटीतांना संघटीत करा!



# मजदूर संकेत

।। अधिवेशन विशेषांक।।




# प्रचंड उत्साहत संपन्न झाले भारतीय मजदूर संघाचे सोळावे राष्ट्रीय अधिवेशन

प्रचंड उपस्थिती, प्रतिनिधींचा उत्साही प्रतिसाद, उत्तम व्यवस्था, उत्कृष्ट नियोजन आणि अधिवेशनाच्या माध्यमातून संपूर्ण देशातील कामगारांना दिला गेलेला सुस्पष्ट संदेश, हे जळगाव येथील छत्रपती श्री. शिवाजी महाराज स्टेडीयममध्ये दि. १९-२० व २१ फेब्रु. २०११ रोजी संपन्न झालेल्या भारतीय मजदूर संघाच्या अ.भा. त्रैवार्षिक अधिवेशनाचे वैशिष्ट्य म्हणता येईल.




भारतीय मजदूर संघाच्या राष्ट्रीय अधिवेशनाच्या उद्घाटन प्रसंगी दीपप्रज्वलन करतांना मदनदासजी देवी, डावीकडून आय. एल. ओ. चे एरियल कॅस्ट्रो, महामंत्री के. लक्ष्मा रेड्डी, विरोधी पक्षनेते एकनाथराव खडसे, पद्मश्री भवरलाल जैन, राष्ट्रीय अध्यक्ष गिरीष अवस्थी, सीटू उपाध्यक्ष के. एल. बजाज, नेपाळचे कामगार नेते हरिदत्त जोशी

अन्य संघटनांच्या नेत्यांची उद्घाटन सत्रातील उपस्थिती आणि मार्गदर्शन हे कालपर्यंत 'यांचे कामगार क्षेत्रात काय काम', असे हिणवणाऱ्यांच्या मतपरिवर्तनाचे सुस्पष्ट संकेत देत होती. आय.एल.ओ.च्या प्रतिनिधींची उपस्थिती भा. म. संघाचा आंतरराष्ट्रीय दबदबा स्पष्ट करीत होती. मा. मदनदासजी देवी यांची उपस्थिती भा. म. संघाची राष्ट्रीयत्वाला अग्रक्रम देण्याची भूमिका अधोरेखित करीत होती.

भा. म. संघाच्या सर्व राष्ट्रीय नेत्यांची उपस्थिती अधिवेशनाच्या विविध सत्रांमधून होणाऱ्या मार्गदर्शनाची उत्सुकता वाढवीत होती तर प्रचंड संख्येने आलेल्या देशभरातील प्रतिनिधींची उपस्थिती भा. म. संघाचे वाढते सामर्थ्य तर दर्शवीत होतीच, त्याच बरोबर भा. म. संघाची विश्वासार्हता सुद्धा स्पष्ट करणारी होती.

जळगाव सारख्या ग्रामीण जिल्ह्यात अधिवेशन घेण्याची परवानगी देऊन जळगावकरांवर दाखविलेला विश्वास जळगावकरांनी सार्थ करून दाखविला. देशातल्या पहिल्या क्रमांकाच्या संघटनेचे अधिवेशन आपण आयोजित करीत आहोत, याची पुरेपुर जाणीव जळगावकरांना होती, असे स्वच्छपणे जाणवत होते.

कार्यक्रम पत्रिकेनुसार सकाळी ठीक साडेदहा वाजता मा. श्री. गिरीश अवस्थीजी, अध्यक्ष भा. म. संघ यांच्या हस्ते मा. श्री. रेड्डीजी, महामंत्री, मा. श्री. मदनदासजी देवी, प्रचार प्रमुख रा. स्व. संघ यांचेसह अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत भा. म. संघाचा ध्वज फडकवला. वाद्यांचा जयघोष, फटाक्यांची आतिषबाजी व घोषणांचा गजर वातावरण भाराऊन टाकणारा होता.

ठीक अकरा वाजता व्यासपीठावरील सर्व मान्यवरांनी दीपप्रज्वलन करून वेदांच्या मंत्रघोषाने भारलेल्या वातावरणात तीन दिवसीय अधिवेशनाचे उद्घाटन केले. विशेष म्हणजे प्रमुख अतिथी महाराष्ट्र विधान सभेतील विरोधी पक्ष नेते भा.ज.पा. आमदार मा. एकनाथजी (नाथाभाऊ) खडसे व स्वागताध्यक्ष मा. भवरलाल जैन यांचे अगदी वेळेवर अधिवेशनस्थळी आगमन झाले.

उद्घाटन सत्राचे प्रास्तविक राष्ट्रीय महामंत्री मा. श्री. के. लक्ष्मा रेड्डी यांनी केले. स्वागताध्यक्ष श्री. भवरलाल जैन यांनी जळगांवकरांच्या वतीने आलेल्या सर्व प्रतिनिधींचे मन:पूर्वक स्वागत केले व मनोगत व्यक्त केले. मा. श्री. नाथाभाऊंनी मोजक्या शब्दात कामगारांवर होत असलेल्या अन्यायाची मिमांसा करीत कामगारांना त्वरीत न्याय मिळावा यासाठी जलदगती न्यायालयांची स्थापना करावी अशी मागणी केली.

आपल्या प्रमुख भाषणात मा. मदनदासजी


।। हम करे राष्ट्र आराधन ।।

चलो जलाए दीप वहाँ जहाँ अभी भी अंधेरा है।
असंघटीतांना संघटीत करा!

देवी यांनी राष्ट्रीय समस्यांना हात घातला. देशात सुरू असलेल्या उच्चस्तरीय भ्रष्टाचाराची चर्चा करतांना त्यांनी 'घोटाळ्यातील सहभागींना फाशी द्या' अशी मागणी केली. सध्या एकामागून एक बाहेर येणाऱ्या घोटाळ्यांची मनस्वी चीड आलेल्या प्रतिनिधींनी मदनदासजींच्या ह्या मागणीचे टाळ्यांच्या गजरात स्वागत केले.

राष्ट्रीय अध्यक्ष मा. गिरीशजींनी आपल्या लिखित भाषणाचा संदर्भ देत तीन वर्षातील प्रमुख घटनांचा उल्लेख करीत सद्यस्थितीचा संदर्भ देत भविष्याचा वेध घेतला.

आय.एल.ओ. प्रतिनिधी, अन्य देशांतील कामगार संघटनांचे प्रतिनिधी आणि देशातील अन्य संघटनांच्या प्रतिनिधींनी सुद्धा यावेळी आपापले विचार व्यक्त केले.

## नेत्रदिपक शोभा यात्रा



शोभायात्रेतील एक दृष्य

जळगांव अधिवेशन देशभरातून आलेल्या प्रतिनिधींच्या आणि जळगांवकरांच्या कायम लक्षात राहील ते पहिल्याच दिवशी निघालेल्या शोभायात्रेमुळे. शोभायात्रा पाहिल्यावर कोणाच्याही हे चटकन लक्षात येत होते की ह्या शोभायात्रेसाठी संयोजकांनी प्रचंड तयारी तर केली आहेच परंतु कल्पकता आणि रसिकता सुद्धा दाखवली आहे. महाराष्ट्राचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज आणि कामगारांचे दैवत भगवान विश्वकर्मा यांच्या भव्य प्रतिमा अग्रस्थानी होत्या. वनवासी क्षेत्रातून अर्थात धुळे, नंदूरबार जिल्ह्यातून असंख्य महिला आणि कामगार शिवाजीराव काकडे यांच्या नेतृत्वाखाली जळगांवला केवळ शोभायात्रेसाठी दाखल झाल्या होत्या. ते सर्वांचे लक्षवेधून घेत होते. शोभायात्रेचा रुट छोटा होता व आलेल्या प्रतिनिधींची संख्या प्रचंड होती. ह्या शोभायात्रेच्या निमित्ताने जळगांवकरांना संपूर्ण भारताचेच दर्शन होत होते. घरेलु कामगार महिला, ठेका मजदूर, औद्योगिक कामगार, बीडी कामगार अशा तळागाळातील कामगारांची उपस्थिती भारतीय मजदूर संघाची ह्या क्षेत्रातील व्यापकता स्पष्ट करीत होती.

## २३ नोव्हेंबर २०११ चलो दिल्ली!

शोभायात्रेचा समारोप जळगावच्या प्रसिद्ध शिवतिर्थावरील जाहीर सभेने झाला. मा. अजितरावांनी ह्या जाहीर सभेचे प्रास्तविक केले. आपल्या प्रास्तविकात अजितरावांनी कामगारांना भेडसावणाऱ्या दैनंदिन समस्यांना वाचा फोडली. श्रीमती लता दीक्षित यांनी प्रमुख्याने महिलांच्या समस्यांची चर्चा केली व महिलांवरील वाढत्या अत्याचाराची




जाहीर सभेला संबोधित करतांना उदयराव पटवर्धन

दखल न घेणाऱ्या राज्य व केंद्र सरकारवर कडक शब्दांत टीका केली.

आपल्या प्रमुख भाषणात मा. उदयराव पटवर्धन यांनी केंद्र सरकारवर चौफेर हल्ला चढविला. यु.पी.ए.- २ चा आतापर्यंतचा कार्यकाळ हा केवळ भ्रष्टाचाराने भरलेला आहे. हजारो कोटी रुपये मंत्र्यांनीच खिशात टाकले आहेत असे राजा किंवा कलमाडी यांचे नाव न घेता त्यांनी सांगितले. अर्थात केवळ टीका करून ह्या समस्या सुटणाऱ्या नाहीत. ह्या समस्यांना खऱ्या अर्थाने वाचा फोडण्यासाठी प्रत्यक्ष कृती कार्यक्रमाची आवश्यकता आहे.


शोभायात्रेच्या अग्रभागी असलेल्या महिला




।। हम करें राष्ट्र आराधन ।।

चलो जलाए दीप वहाँ जहाँ अभी भी अंधेरा है।
असंघटीतांना संघटीत करा!

रस्त्यावर उतरून सरकारला जाब विचारण्यासाठी भा. म. संघाने दि. २३ नोव्हेंबर २०११ रोजी संसदेवर प्रचंड मोर्चा काढण्याचे ठरविले असून, आजच आम्ही 'चलो दिल्ली' चा नारा देत आहोत



जाहीर सभेला उपस्थित असलेला जनसमुदाय

असे सांगून उदयरावांनी सर्वांना दि. २३ नोव्हेंबर रोजी प्रचंड संख्येने दिल्लीत येण्याचे आवाहन केले.

मा. वैजनाथ राय यांनी जाहीर सभेचा समारोप केला. त्यांनी आपल्या भाषणात राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय समस्यांना हात घातला. प्रभाकर बाणासुरे यांनी आभार मानले.

### राष्ट्रीय महामंत्री आणि वित्तमंत्री यांचे अहवाल...

पहिल्या दिवसाचे अखेरचे सत्र होते भा. म. संघाचे राष्ट्रीय महामंत्री आणि राष्ट्रीय वित्तमंत्री यांच्या त्रैवार्षिक अहवालाचे. प्रथम वित्तमंत्री मा. श्री. वसंतराव जी. पिंपळापुरे यांनी तीन वर्षांचा आर्थिक लेखा-जोखा सादर केला. आपल्या अहवालात त्यांनी विवरण पत्रांचे कंटाळवाणे वाचन न करता ठळक गोष्टींचा तपशिल दिला. त्यांच्या कार्यकाळात भा. म. संघाचे दिल्लीत स्वत:चे कार्यालय उभे राहिल्याचा आनंद स्पष्टपणे दिसत होता. कार्यालय उभारणीसाठी सहकार्य करणाऱ्या लाखो कार्यकर्त्यांचे त्यांनी आभार मानले. संलग्नता शुल्कात झालेली वाढ सुद्धा त्यांचा आनंद वाढवीत होती. संलग्नता शुल्क वाढीत महाराष्ट्र नंबर एक वर असे सांगून त्यांनी महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांचा आनंद सुद्धा वाढविला.

महामंत्री मा. श्री. के. लक्ष्मा रेड्डी यांचा लिखित अहवाल म्हणजे भा. म. संघाच्या देशभरातील लाखो सभासदांसाठी माहितीचा खजिनाच आहे. आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय पातळीवर कामगार जगतातील घडामोडींचा त्यांनी घेतलेला वेध लक्षणीय होता. पूर्ण अहवालाचे वाचन न करता ठळक बाबींचा त्यांनी उल्लेख केला.

हे दोन्ही अहवाल भा. म. संघाच्या वाढत्या संघटनात्मक व आर्थिक प्रभावाचे प्रतिक होते.

### चिंतन सत्र :

दुसऱ्या दिवसाच्या पहिल्या सत्राचे प्रमुख वक्ते होते रा. स्व. संघाचे ज्येष्ठ प्रचारक मा. श्री. मनमोहन वैद्य ! आपल्या बौद्धीकात त्यांनी छोट्या




मा. श्री. मनमोहन वैद्य संबोधित करतांना

छोट्या गोष्टींच्या माध्यमातून नेतृत्वाचे तसेच कार्यकर्त्यांचे व संघटनेचे महत्व विशद केले. भारतीय मजदूर संघ ह्या नावातील भारतीय - मजदूर आणि संघ यांचा नेमका अर्थ सुद्धा समजावून सांगितला.

### महिला सत्र :

अधिवेशनाचा दुसरा दिवस सर्वार्थाने अविस्मरणीय ठरला तो महिला सत्राने अधिवेशनाला महिलांची रेकॉर्ड उपस्थिती होती. ५००




महिला सत्राच्या प्रमुख वक्त्या सौ. चंद्रिका चौहान

च्या वर उपस्थित असलेल्या महिला प्रतिनिधींच्या साक्षीने झालेल्या ह्या सत्रात सर्व पुरुष प्रतिनिधी सुद्धा हजर होते. ह्या सत्राचा प्रारंभ ए कर्नाटकी महिला प्रतिनिधीने कन्नड भाषेत गायीलेल्या श्रमिक गीताने झाला. केंद्रीय उपाध्यक्ष गीताताई गोखले यांनी छोटेखानी प्रास्तविक केले. त्यांत संघटनात्मक आशय भरपूर होता. महिला सत्राला पूरक असे ते प्रास्तविक होते.




महिलांच्या विषयांना प्राधान्य देण्यासाठी या सत्राची रचना होती हे जरी खरे असले तरी पुरुष पदाधिकाऱ्यांना मज्जाव नव्हता. कारण भा. म. संघात महिला संघटन हा विषय आहे. महिला आघाडी अशी संकल्पना नाही भा. म. संघाचे तत्कालीन महामंत्री मा. श्री. के. लक्ष्मा रेड्डी यांनी सुद्धा ह्या सत्रास संबोधित करतांना अनेक उपयुक्त सूचना केल्या.

अर्थात हे सत्र लक्षात राहील ते प्रमुख वक्त्या चंद्रिका चौहान, प्रमुख संचालक, सेल्फ हेल्प ग्रुप व उद्योग वर्धिनी यांच्या भाषणासाठी. आपला विषय मांडतांना त्यांनी अलंकारीक आणि शब्दांना ओझे होईल, अशा भाषेचा अजिबात वापर केला नाही. स्वत:चे अनुभव कथन करीत त्यांनी महिलांना प्रोत्साहीत केले. त्यांच्या भाषणाने केवळ महिला प्रतिनिधीच प्रभावीत झाल्या असे नव्हे, तर प्रचंड संख्येने उपस्थित असलेल्या पुरुष प्रतिनिधींना सुद्धा प्रभावीत करण्याची ताकत त्यांच्या भाषणात होती.

सत्राच्या अध्यक्षपदावरून सत्राला संबोधित करताना श्रीमती गीता गुंडे यांनी संघटीत क्षेत्रातील महिलांना असंघटीत क्षेत्रातील महिलांसाठी अधिक वेळ देण्याचे आवाहन केले. श्रीमती टी. दर्शनाजी (मणीपूर), लता दीक्षित (मध्य प्रदेश), मंगलम्बाराव (कर्नाटक) व श्री. दादू पडवळ यांनी वेगवेगळ्या क्षेत्रातील महिलांच्या समस्या मांडल्या.

वंदना कामटे यांनी अतिशय सुरेख सूत्रसंचालन केले.

### ठराव :

ज्याला आपण अधिवेशनाचा आत्मा म्हणतो असे ठराव सत्र दोन टप्प्यात पार पडले. ठराव मांडणाऱ्याने ठराव मांडल्यावर ४ ते ५ प्रतिनिधींनी त्यावर मत प्रदर्शन करावे, अशी योजना होती. त्यानुसार सदर ठराव मांडण्यात आले.

**१) वाढत्या महागाईला आळा घालावा**
**२) नोकर भरतीवरील बंदी उठवावी**
**३) सार्वजनिक उद्योगातील निर्गुंतवणूक त्वरीत थांबवावी.**
**४) कामगार कायद्यांची अंमलबजावणी करावी.**
**५) असंघटीत क्षेत्रातील कामगारांना सुरक्षा कायद्याचा लाभ द्यावा.**
**६) कंत्राटी कामगार पद्धत बंद करावी**
**७) विदेशी बँकामधील भारतीयांनी ठेवलेला काळा पैसा त्वरीत भारतात आणावा**
**८) नवीन आर्थिक धोरणाचा पुनर्विचार व्हावा**

**ह्या महत्वपूर्ण ठरावांवर अतिशय व्यापक आणि विस्तृत अशी चर्चा झाली. प्रतिनिधींच्या सक्रीय भागीदारीमुळे एरवी कंटाळवाणे वाटणारे ठराव सत्र जीवंत सत्र वाटले.**

### संघटीतांनो, असंघटीतांना संघटीत करा :

१६ व्या अ.भा. त्रैवार्षिक अधिवेशनाचा मूलमंत्र होता असंघटीतांना संघटीत करण्याचा! ह्या मंत्राच्या विविध पैलूंवर झगझगीत प्रकाश झोत टाकला भा. म. संघाच्या राष्ट्रीय संघटन मंत्री मा. श्री. के. सी. मिश्रा यांनी. आपल्या सुमारे ४५ मिनीटांच्या प्रभावी वक्तव्यात मिश्राजींनी असंघटीत कामगारांचे होत असलेले शोषण सर्वांना जाणवेल अशा शब्दात मांडले. असंघटीत कामारांना संघटीत करण्याची आवश्यकता त्यांनी प्रतिपादीत केली व हे संघटन करण्याची जबाबदारी त्यांनी प्रस्थापित अशा संघटीत कामगारांवर पर्यायाने विविध महासंघांवर टाकली. ह्या कामासाठी तन-मन आणि धन याची आवश्यकता आहे व ही आवश्यकता सुस्थितीत असलेल्या महासंघांनी पूर्ण करावी, असा आदेश व आवाहन मिश्राजींनी केले.

२३ नोव्हेंबर च्या नियोजीत दिल्ली मोर्चाच्या संबंधात प्रतिनिधींची मते जाणून घेण्यात आली. सहसंघटन मंत्री मा. श्री. सुरेंद्रजींनी ह्या सत्राचे संचालन केले. विविध प्रतिनिधींनी चर्चेत सहभागी होतांना केलेल्या वक्तव्यावरून असे जाणवत होते, की दिल्ली मोर्चा आयोजकांच्या अपेक्षेपेक्षाही जास्त यशस्वी होईल.

श्रमशोध मंडळाच्या वेबसाईटचे शानदार उद्घाटन मा. मदनदासजी देवी यांच्या हस्ते अधिवेशनाचे औचीत्य साधून करण्यात आले. श्री. एस. एन. देशपांडे यांनी प्रास्ताविकाच्या माध्यमातून वेबसाईट ची आवश्यकता प्रतिपादन केली.

अधिवेशन यशस्वी करण्यासाठी शेकडो हात दिवसरात्र राबले. स्वत: न जेवता प्रतिनिधींच्या भोजनाची व्यवस्था केली. न झोपता प्रतिनिधींच्या निवासाची व्यवस्था केली. स्वत: आजारी असतांना आजारी प्रतिनिधींच्या वैद्यकीय उपचारांची व्यवस्था केली. हसतमुखाने सर्वांचे स्वागत केले. घरचेच कार्य आहे, असे मानून सर्व शहर सजवले. अधिवेशन स्थळ सुशोभीत केले. या राबणाऱ्या व्यक्तिंचा प्रातिनिधीक परिचय अधिवेशन प्रमुख प्रभाकर बाणासुरे यांनी करून दिला. उपस्थित हजारो प्रतिनिधींनी टाळ्यांच्या गजरात ह्या कार्यकर्त्यांचे आभार मानले.

### नवी कार्य समिती :

अन्य संघटनांच्या अधिवेशनात ज्या गोष्टींसाठी अधिवेशन गाजते ती गोष्ट भा. म. संघासाठी केवळ एक उपचार असतो हे पून्हा एकदा सिद्ध झाले. मा. श्री. हसुभाई दवे यांच्या देखरेखीखाली भा. म. संघाची आगामी ३ वर्षांची कार्यकारीणी निवडण्यात आली.

अध्यक्षपदाची जबाबदारी गेली अनेक वर्षे भारतीय कामगारांचे युनोत प्रतिनिधीत्व करणाऱ्या श्री. साजी नारायण यांचेवर सोपविण्यात आली. एका युवा कार्यकर्त्याकडे अध्यक्षपदाची सुत्रे सोपविणाऱ्या भा. म.




संघाने महामंत्री पदाची धुरा गेल्या अनेक वर्षांचा अनुभव पाठीशी असलेल्या मा. श्री. वैजनाथ राय यांना सोपविली. वित्तमंत्री श्री. सर्वेशचंद्र द्विवेदी असतील, तर मा. श्री. उदयराव



के. साजिनारायणन



बैजनाथ राय



उदयराव पटवर्धन

पटवर्धन व मा. श्री. के. एल. रेड्डी नवे उपाध्यक्ष असतील. श्री. के. सी. मिश्राजी यांचेकडे पुन्हा एकदा संघटन मंत्र्यांची तर सुरेंद्रनजीकडे सहाय्यक संघटन मंत्रीपदाची जबादारी सोपविण्यात आली आहे. नव्या पदाधिकाऱ्यांना हार्दिक शुभेच्छा!

## कार्यकर्त्याने स्वत: समस्या बनू नये... मा. मदनदास देवी

प्रचारक प्रमुख, रा. स्व. संघ

अधिवेशनाचा सामारोप रा. स्व. संघाचे प्रचारक प्रमुख आणि भा. म. संघाचे प्रभारी मा. मदनदासजी देवी यांच्या मार्गदर्शनाने झाला. त्यांचे भाषण ही कार्यकर्त्यांना दिर्घकाळ पुरेल, अशी शिदोरी होती. कार्यकर्त्याने समस्या निवारण केली पाहिजे. स्वत:च संघटनेसाठी समस्या बनू नये, असा अतिशय आशयपूर्ण संदेश मा. मदनदासजींनी उपस्थितांना दिला. आपल्या संघटनेचे नाव भारतीय मजदूर संघ असे का ठेवले, हे प्रत्येक सभासदाने नीट जाणून घ्यावे व त्यानुसारच आपले आचरण ठेवावे, असेही त्यांनी सुचविले.

संपूर्ण वंदे मातरम् नंतर ध्वजावतरण झाले. भारावलेल्या अंत:करणाने एकमेकांचा निरोप घेत देशभरातून आलेले प्रतिनिधी आपापल्या गावी परतले.

## विशेष उल्लेखनीय...

१) भा. म. संघाच्या भगव्या झेंड्यांनी आणि पताकांनी संपूर्ण जळगाव शहर सुशोभित करण्यात आले होते. त्यामुळे संपूर्ण शहरात भगव्याचेच राज्य होते.

२) प्रतिनिधींच्या निवासाची व्यवस्था शहरातील अकरा मंगल कार्यालयात केलेली होती. अधिवेशन स्थळापासून १० मिनिटांच्या अंतरावर सर्व निवास व्यवस्था असल्याने विविध ठिकाणी व्यवस्था असून सुद्धा कोणाची गैरसोय होत नव्हती.

३) अपेक्षेपेक्षा जास्त प्रतिनिधी आल्याने व्यवस्थेवर थोडा दबाव आला होता. परंतु निवास व्यवस्था प्रमुख श्री. नानासाहेब बिचवे यांच्याकडे कार्यकर्त्यांची राखीव फौज तयार असल्याने निवासाबद्दल काही समस्या उद्‌भवली, तर त्या समस्येचे निवारण देखील त्वरेने होत होते.

४) अपेक्षेपेक्षा जास्त प्रतिनिधींमुळे भोजन व्यवस्थेवर देखील दबाव वाढत होता परंतु भोजन व्यवस्था प्रमुख डिफेन्सचे श्री. अरुण सूर्यवंशी यांनी ही व्यवस्था इतक्या कुशलतेने सांभाळली, की दबाव असतांना सुद्धा कुठेही गडबड गोंधळ झाला नाही. सर्वांची आवड-निवड सांभाळणे शक्य नसते, परंतु तरीही भोजन व्यवस्थेला सर्वच प्रतिनिधींच्या पसंतीची पावती मिळाली.

५) आलेल्या प्रतिनिधींचे स्वागत आणि योग्य ती मदत करण्यासाठी जळगाव व भुसावळ रेल्वे स्टेशनवर स्वागत कक्ष उभारण्यात आले होते. तीन दिवस आणि रात्र ह्या स्वागत कक्षाचे काम अव्याहतपणे सुरु होते. श्री. ईश्वर खैरनार व त्यांच्या सहकाऱ्यांनी ही जबाबदारी जराही न कंटाळता हसतमुखाने सांभाळली.

६) मिडीयाची व्यवस्था ही अती उत्तम होती ज्या बाबतीत आपली सदैव तक्रार असते, त्याबाबतीत ह्या अधिवेशनात मात्र सर्व अनुशेष भरून काढला गेला. त्यामुळे प्रसिद्धीच्या दृष्टीने ह्या अधिवेशनाने खुपच आघाडी घेतली. मिडीया प्रभारी श्री. पी. डी. देशपांडे यांचे कार्य निश्चितच अभिनंदनीय आहे.

७) शोभायात्रा हा या अधिवेशनाचा प्राण होता. यापूर्वीच्या कित्येक अधिवेशनात शोभायात्रा निघालेली नव्हती. परंतु ह्या वेळी जळगावकरांनी शोभायात्रेचा आग्रह केंद्राकडे धरला. मा. अजितरावांनी व श्री. बाणासुरे यांनी अग्रही पाठपुरावा केला आणि शोभायात्रेची परवानगी मिळवली. ह्या संधीचे जळगावकरांनी सोने केले. अतिशय भव्य अशी शोभायात्रा आयोजित केली. दोन सुशोभीत अश्वांवर दोन महिला बसल्या होत्या. महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज आणि कामगारांचे दैवत भगवान विश्वकर्मा यांच्या भव्य प्रतिमा यात्रेच्या अग्रस्थानी होत्या. ग्रामीण, वनवासी भागातून आलेल्या महिलांची उपस्थिती आणि घरेलू कामगार-कंत्राटी कामगार, औद्योगिक कामगार तसेच परंपरागत कार्यालयीन कामगार भा. म. संघाचा ह्या क्षेत्रातील विस्तार स्पष्ट करीत होता. शिवाजीराव काकडे यांच्या नेतृत्वाखाली हजारोंच्या संख्येने आलेले वनवासी स्त्री-पुरुषांनी वाद्यांच्या साथीने धरलेला नृत्याचा ठेका अन्य प्रतिनिधींना सुद्धा प्रभावीत करीत होता.

एकूणच शोभायात्रेचे नियोजन आणि आयोजन अतिशय उत्तम होते. श्री. सुरेश सोनार यांचेवर ही जबाबदारी सोपविलेली होती. व ही जबाबदारी श्री. सोनार व त्यांच्या सहकाऱ्यांनी उत्तमपणे आणि कल्पकतेने सांभाळली.

दररोज बदलला जाणारा व्यासपिठावरील बॅक ड्रॉप हे ह्या अधिवेशनाचे आणखी एक आगळे-वेगळे वैशिष्ट्य! बॅकड्रॉप बदलायचा म्हणून बदलला जात नव्हता, तर प्रत्येक बदल हा वेगळा संदेश देत होता. संयोजकांच्या कल्पकतेची जेवढी तारीफ करावी, तेवढी थोडीच आहे. श्री. पी. जे. पाटील यांच्याकडे अधिवेशन व्यवस्थापनाची जबाबदारी होती.




शांत स्वभाव आणि हसतमुख चेहरा हे पी. जे. पाटील यांचे वैशिष्ट्य. कोणत्याही समस्या निवारणांचे अखेरचे ठिकाण म्हणजे पी. जे. पाटील. अनेक समस्यांना आणि विविध दबावांना सक्षमपणे सामोरे जात पी. जें. नी ही जबाबदारी सांभाळली.

श्री. किरण पाटील यांनी अनेक जबाबदाऱ्या लीलया सांभाळल्या. श्री. बाणासुरे यांच्या भात्यातील प्रभावी शस्त्र म्हणजे किरण पाटील. धावपळीचा कंटाळा नाही. कशाची तक्रार नाही की त्रागा नाही. काम कोणतेही असो उत्साहाने स्वीकारणार. खऱ्या अर्थाने किरण पाटील म्हणजे अधिवेशनाची मास्टर की होती.




**अधिवेशनातील मिडीया कक्ष**

मनोज रायपुरकर यांच्या सुद्धा विशेष उल्लेख करणे आवश्यक आहे. मनहर भाई मेहता पतसंस्थेत लिपिक म्हणून काम करणाऱ्या मनोजने भा. म. संघाच्या शिर्षस्थ पदाधिकाऱ्यांची व्यवस्था इतकी उत्तम ठेवली, की हे अधिकारी एखादेवेळेस अधिवेशन विसरतील पण मनोज मात्र त्यांच्या कायम लक्षात राहील.

सर्वांचा उल्लेख करीत असतांना जळगाव अधिवेशन प्रमुख श्री. प्रभाकर



**अधिवेशन कार्यालयात आलेल्या प्रतिनिधींची नोंद करतांना**

बाणासुरे यांचा उल्लेख केला नाही, तर हा विशेषांक अपूर्ण वाटेल. अधिवेशन महाराष्ट्रात होणार हे निश्चित झाल्यानंतर पुणे आणि सोलापूर सारख्या तगड्या स्पर्धकांशी स्पर्धा करीत अधिवेशन जळगावला नेले आणि अन्य फौज फाटा जमा करीत गेल्या तीन वर्षांपासून अधिवेशन यशस्वी करण्याचा ध्यास घेतला. एखादा विषय सतत तीन वर्षे जिवंत ठेवणे ही सोपी गोष्ट नाही. परंतु श्री. बाणासुरे यांनी केवळ विषय जिवंत ठेवला असे नाही, तर त्यात प्राण भरला. अनेक सहकारी ह्या कामासाठी प्रोत्साहीत केले. प्रत्यक्ष अधिवेशन कामात अनेक समस्या निर्माण झाल्या. परंतु न डगमगता नानासाहेब बिचवे, सुभाष भावसार, सुरेश सोनार, अरुण सूर्यवंशी, किरण पाटील आदींच्या मदतीने श्री. बाणासुरे यांनी ह्या समस्यांचे निवारण केले. अनेक योजना आखल्या आणि त्या पूर्णत्वास नेल्या. त्यामुळे जळगाव अधिवेशनाशी त्यांचे नाव कायमचे संलग्न राहील.

प्रदेशाचे सचिव श्री. अनिल ढुमणे, श्रीपाद कुटासकर आणि जयंत देशपांडे यांचे योगदान विसरता येणार नाही. तिघेही आठ दिवस आधी जळगावात डेरेदाखल झाले होते. आणि 'जिथे कमी तिथे आम्ही' ह्या उक्तीप्रमाणे त्यांनी पडेल ती जबाबदारी स्वीकारली आणि पूर्ण केली. प्रदेशाचे पूर्ण कालीन कार्यकर्ते श्री. नितीन कुलकर्णी, मोहन पवार, दादू पडवळ, कुट्टी, अर्जुन, सचिन, झा आदी कार्यकर्त्यांनी सुद्धा महत्वपूर्ण भूमिका बजावली.

श्री. एस. डी. कुलकर्णी, अध्यक्ष, अजीत कुलकर्णी, प्रदेश महामंत्री, एस. एन. देशपांडे, प्रभारी व श्री. अण्णा धुमाळ, बापू डोइफोडे आणि सौ. वेदा आगटे या प्रदेश पदाधिकाऱ्यांचे योगदान आणि मार्गदर्शन अधिवेशन यशस्वी करण्यासाठी खूपच मोलाचे होते.

'विचार दर्पण' या पुस्तिकेचे प्रकाशन मा. मदनदासजी देवी ह्यांच्या शुभहस्ते उद्घाटन सत्रात करण्यात आले, तर 'घरेलू कामगारांच्या समस्या' या विषयावरील सर्वेक्षणाचा अहवाल मा. गिरीशजी अवस्थी यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आला.

## मराठमोळे स्वागत



अधिवेशनाच्या प्रवेशद्वारावर मराठमोळ्या वेशातील श्री व सौ. आलेल्या प्रत्येक प्रतिनिधीचे हसतमुखाने स्वागत करीत होते. परंतु हे जोडपे सजीव नव्हते तर पुतळे होते. परंतु सजीवापेक्षाही सजीव वाटत होते. ह्या जोडप्याबरोबर फोटो काढून घेण्याचा मोह प्रतिनिधींना आवरता आला नाही.